शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

" स्वच्छता ही सेवा "

<u>प रि प त्र क</u>

शिवाजी विद्यापीठ परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली सर्वांचीच आहे, हे लक्षात घेऊन महात्मा गांधी जयंतीनिमित्त दिनांक ०२ ऑक्टोंबर, २०१३ पासून विद्यापीठामध्ये 'विशेष स्वच्छता मोहिम' राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने यावर्षी **दि.०२ ऑक्टोंबर २०१९** रोजी **शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये 'स्वच्छता अभियान' राबवावयाचे आहे.** या अभियानाअंतर्गत अधिविभागाच्या इमारती, प्रशासकीय इमारती आणि रस्ते येथील स्वच्छता मोहिम राबविली जाणार आहे. त्याचे नियोजन खालीलप्रमाणे राहील.

१. प्रत्येक अधिविभागातील शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी- विद्यार्थीनी यांनी आपआपला अधिविभाग तसेच अधिविभागासमोरील परिसरातील गवत तसेच इतर कचरा एकत्रित करून स्वच्छता करावयाची आहे. इमारतीभोवतीचे किमान वीस फूट अंतरातील परिसर स्वच्छ करावा.

२. परीक्षा भवन क्रमांक एक, दोन येथील कर्मचारी आपआपल्या इमारतीबाहेरील स्वच्छता करतील. तसेच आपआपल्या इमारती आणि नजीकच्या रस्त्यांवरील परिसर कचरामुक्त करतील. अनावश्यक वाढणारे गवतही काढतील.

३. दूरशिक्षण विभाग, गेस्ट हाऊस येथील कर्मचारी आपआपल्या इमारतीच्या आजूबाजूचा भाग आणि संपर्क रस्ते येथील स्वच्छता करतील.

४. प्रशासकीय इमारतीतील कर्मचारी हे सबस्टेशन-हेल्थसेंटर-संगीतशास्त्र अधिविभाग तलाव-पाचबंगला-गेस्ट हाऊस-लेडीज होस्टेल-भूगोल अधिविभाग या भागातील रस्त्याकडेची स्वच्छता करतील.

५. अभियांत्रिकी विभागाचे कर्मचारी हे, मुख्य पॉवर स्टेशन, अभियांत्रिकी विभागाचे गोडावून येथील परिसर स्वच्छ करतील.

६. एन.एस.एस. पी.जी. युनीटचे स्वयंसेवक हे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह (लोक कला केंद्र) येथील परिसर स्वच्छ करतील.

७. मुलांचे वसतिगृह आणि मुलींचे वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींनी वसतिगृह परिसर स्वच्छ करावयाचा आहे. या संदर्भातील नियोजन व पर्यवेक्षण वसतिगृह रेक्टरनी करावयाचे आहे.

८. विद्यापीठ निवासस्थानामध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटूंबियांनी निवासस्थान परिसरातील गवत व इतर कचरा काढून स्वच्छता मोहिम राबवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

९. डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, क्रीडा विभाग, आरोग्य केंद्र, कंझ्युमर्स स्टोअर्स, कॅन्टीन्स्, स्नॅक स्पॉटस् इ. अन्य सर्व विभागांमार्फत त्यांच्या कार्यालयीन इमारती व परिसरात गवत व इतर कचरा काढून स्वच्छता मोहिम राबवतील.

१०. क्रिडा विभागातील शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांच्या सहाय्याने मैदाने स्वच्छ करून तेथील परिसर स्वच्छ करावयाचा आहे.

**११. या अभियानाअंतर्गत कर्मचारी, विद्यार्थी, शिक्षक यांची उपस्थिती आणि कामाचा अहवाल आस्थापना विभागास दि.०७/१०/२०१९ रोजीपर्यंत सादर करावयाचा आहे.**

सदरची स्वच्छता मोहीम ही **सकाळी ०७.३० ते १०.००** या वेळेत होईल. त्यानंतर मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारात महात्मा गांधीजींच्या फोटोला पुष्पांजली अर्पण करण्यात येईल. सदरचे अभियान राबविताना अधिविभागप्रमुख हे आपआपल्या अधिविभागाच्या स्वच्छतासाठीचे पर्यवेक्षण करतील. परीक्षा विभागाचे उपकुलसचिव हे परिक्षा भवन १ व २ येथील नियोजन करतील. दूरशिक्षण विभागाचे संचालक/उपकुलसचिव हे तेथील कार्य पाहतील. तर प्रशासकीय विभागाची जबाबदारी संबंधित उपकुलसचिव यांचेकडे राहील. या संपूर्ण मोहिमेसाठीचे पर्यवेक्षण हे मा.कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व अन्य वैधानिक अधिकारी यांच्याद्वारा करण्यात येईल.यावर्षीच्या स्वच्छता मोहिम अभियानात **विद्यापीठ परिसरातील प्लॅस्टीक निर्मूलनाबाबत विशेष लक्ष देणेचे आहे.** अभियान यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य अधिविभाग आणि प्रशासकीय विभाग यांनी उपलब्ध करून घ्यावयाचे आहे.

उपरोक्तचे स्वच्छता अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व विद्यार्थी, प्रशासकीय सेवक, शिक्षक यांनी या मोहिमेत सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**आदेशावरून**

(प्रा. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर)

**कुलसचिव**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

जा.क्र.आस्थापना/ 4026

दिनांक : 27 SEP 2019

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. मा.कुलगुरु, मा.प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, यांच्या कार्यालयास माहितीसाठी.
५. इंटरनेट सेल - सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (INTRANET)

टीप:— सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, यांच्या निदर्शनास आणावे.